Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 03 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०३ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. या निमित्तानं शैक्षणिक संस्थांसह विविध सामाजिक संस्था-संघटनांच्या वतीनं आदरांजलीपर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केलं आहे. सावित्रीबाई महिला सक्षमीकरणाच्या जनक असून, शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा क्षेत्रातल्या अग्रणी आहेत. लोकांसाठी जीवनाचा दर्जा उत्तम ठेवण्यासाठी काम करताना सावित्रीबाईंचं कार्य सतत प्रेरणा देत असल्याचं, पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सावित्रीबाई फुले यांना आदरांजली अर्पण केली आहे. खंडाळा तालुक्यातल्या नायगाव इथं सावित्रीबाई फुले जयंती उत्सवात मुख्यमंत्री सहभागी होत आहेत.

नाशिक मध्ये मुंबई नाका इथं उभारण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या भव्य अर्धाकृती पुतळ्यास माजी मंत्री आणि समता परिषदेचे नेते छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत काल अभिवादन करण्यात आलं. या निमित्ताने फायर शो देखील करण्यात आला.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. यामध्ये अशोक विहार इथं झोपडपट्टीतल्या रहिवाशांसाठी बांधलेल्या सुमारे सतराशे सदनिकांचं उद्घाटन, दोन नगर पुनर्विकास योजना, द्वारका इथं केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एकीकृत कार्यालय परिसराचं उद्घाटन, दिल्ली विद्यापीठात तीन नवीन योजनांचा शुभारंभ आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

****

परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अग्रेसर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. सामाजिक माध्यमावरच्या संदेशात त्यांनी गेल्या पाच वर्षातली परकीय गुंतवणुकीची आकडेवारी प्रसिद्ध केली. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्याच्या काळात राज्यात एक लाख १३ हजार २३६ कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या चार वर्षांत सरासरी एक लाख १९ हजार ५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. याचाच अर्थ संपूर्ण वर्षभराच्या ९४ पूर्णांक ७१ टक्के गुंतवणूक ही फक्त सहा महिन्यात आली असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

महाराष्ट्र पोलीस विभागाचा वर्धापन दिन काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत साजरा झाला. मुंबईत गोरेगाव इथल्या राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर झालेल्या कार्यक्रमात पोलीस पथकांनी संचलनं तसंच प्रात्यक्षिकं सादर केली.

****

महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासोबतच त्यांच्या डिजिटल शिक्षणावर देखील लक्ष देणं आवश्यक असल्याचं, नवी दिल्लीच्या खासदार बांसुरी स्वराज यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं काल सेवासदन शिक्षण संस्थेच्या वतीने दिला जाणारा 'विदर्भस्तरीय रमाबाई रानडे स्मृती शिक्षण प्रबोधन पुरस्कार' वितरण सोहळ्यात त्या काल बोलत होत्या. महिलांच्या राजकीय सशक्तिकरणावर देखील स्वराज यांनी यावेळी भर दिला.

****

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभियानांतर्गत नांदेडमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात काल 'विद्यापीठ वाचत आहे' हा उपक्रम राबवण्यात आला. तरुण पिढीला ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करणं आणि वाचन संस्कृती वाढवणं महत्त्वाचं असून, वाचल्याशिवाय कोणीही मोठं होणार नाही, असं विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यावेळी म्हणाले. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम जिल्ह्यातल्या सर्व शाळांपर्यंत नेण्याचा मानस जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी यावेळी व्यक्त केला.

****

नांदेड जिल्ह्यातल्या लोहा नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा जिजाबाई मुकदम-चव्हाण यांचं काल वृद्धापकाळाने निधन झालं, त्या ८५ वर्षांच्या होत्या. २००३ ते

२००८ या काळात त्यांनी नगराध्यक्ष म्हणून काम पाहिलं होतं. त्यांच्या पार्थिवावर आज लोहा इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

मुंबई – गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यात आज पहाटे झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले. मुंबईकडे जाणारी स्कॉर्पिओ गाडी रस्त्याच्या कडेला उभी असताना पाठीमागून आलेल्या टोईंग गाडीने कारला धडक देऊन हा अपघात झाला. मृत सर्वजण महाडचे रहिवाशी असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खुलताबाद इथं जिल्हास्तरीय मुस्लिम धार्मिक तबलीगी इज्तेमा कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. हा कार्यक्रम पाच तारखेपर्यंत चालणार आहे. त्या अनुषंगानं कसाबखेडा फाटा ते देवगाव रंगारी, लासूर ते रायपूर तसेच कसाबखेडा फाटा ते शिऊर बंगला या भागातील वाहतुक मार्गात बदल करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी दिले आहेत.

****

महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातल्या वीजग्राहकांसाठी काल घेतलेल्या वीजबिल दुरुस्ती मेळाव्याच्या पहिल्या दिवशी २२० ग्राहकांच्या तक्रारींचं जागेवरच निराकरण करण्यात आलं. यापैकी ६६ ग्राहकांनी तत्काळ साडेचार लाख रुपयांची वीज देयकं अदा केली. आजही हा मेळावा सुरू राहणार आहे.

****